नि. फौ. ख. क्र.७३/२०२२ **निशाणी क्र.३७**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते की,**

नाव – लक्ष्मण विक्रम शेंद्रे

वय – ४० वर्षे, व्यवसाय – शेती

पत्ता – परडी माटेगांव, ता. वडवणी, जि. बीड.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्री. ए. डी. साखरे यांचे मार्फत सरतपास दु.१.२० वा. सुरुः**

**१.** घटना दि.२५.०९.२०२२ रोजी सकाळी ७.३० वाजता आमच्या घरासमोर घडली आहे. त्यावेळी दसरा असल्यामुळे आम्ही घराची साफसफाई करीत होतो. साफसफाईच्या वेळी घरावरील पत्रे काढले होते आणि त्यानंतर ते पत्रे पुन्हा घरावर टाकतेवेळी पत्रे थोडे मागे सरकले होते. पत्रे मागे सरकल्यामुळे आरोपी नामे महेश आला व त्याने मला शिवीगाळ सुरु केली. मी त्याला असे म्हणालो की, पत्रे होते तसे परत लावुन घेतो, तरी सुद्धा महेश मला शिवीगाळ करीत होता. त्यानंतर तो त्याच्या घरात गेला, लोखंडी हातोडा घेवुन आला आणि तो हातोडा माझ्या डोक्यात मारला.

**२.** आरोपीने ज्या हातोड्याने मला मारहाण केली होती तो हातोडा मला दाखविल्यास ओळखु शकतो. आता मला एक हातोडा दाखविण्यात आला, सदर हातोडा तोच आहे ज्या हातोड्याने आरोपीने मला मारहाण केली होती. सदर हातोड्यास **अर्टिकल अ** देण्यात येत आहे.

३. त्यानंतर महेशची आई विना आली व त्यांनी माझे हात धरले, ज्ञानोबा शेंद्रे यांनी माझ्या पाठीत दगड मारला. सर्व आरोपींनी मला जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर गोरख शेंद्रे आणि अशोक शेंडगे यांनी मला पो. स्टेशनला नेले. वडवणी पो. स्टेशनला गेलो असता मला पोलीसांनी वडवणी येथील सरकारी दवाखान्यात जायला सांगितले. वडवणीच्या दवाखान्यात गेलो असता त्यांनी प्रथोमपचार करुन बीडच्या सरकारी दवाखान्यात जाण्यासाठी सांगितले. त्यानंतर मी बीडच्या सरकारी दवाखान्यात गेलो होते, तेथे मी दोन दिवस भरती होतो. दवाखान्यातुन सुट्टी झाल्यानंतर मी वडवणी पो.स्टेशनला गेलो व आरोपी विरुध्द तक्रार दाखल केली.

४. आता मला दि.२७.०९.२०२२ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. सदर फिर्याद मी स्वतः दाखल केलेली असुन त्यातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर असलेली सही माझीच आहे. त्यास **निशाणी ३८** देण्यात येत आहे. आता मला दि.२७.०९.२०२२ रोजीचा प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. सदर अहवाल मी सांगित्याप्रमाणे असुन त्यातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर असलेली सही माझीच आहे. त्यास **निशाणी ३९** देण्यात येत आहे. मी सर्व आरोपींना ओळखतो. सर्व आरोपी आज रोजी न्याय कक्षात हजर आहेत.

सरतपास पुर्ण

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. टी. ए. शेख यांच्या मार्फत**

५. हे म्हणणे खरे आहे की, परडी गाव आणि माटेगाव ही दोन्ही गावे वेगवेगळी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, परडी गावाची लोकसंख्या १५००–२००० आहे. हे म्हणणे खरे आहे की, गोरख शेंद्रे आणि अशोक शेंडगे हे आमच्या परडी गावातील असून आमचे पाहुणे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गोरख आणि अशोक यांच्याशी माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, परडी गावामधुन वडवणी पो. स्टेशनला मोटारसायकल वरुन येण्यासाठी अंदाजे ३० मिनीटे ते ६० मिनिटे वेळ लागतो. हे म्हणणे खरे आहे की, सरकारी दवाखाना बीड जवळ पोलीस चौकी आहे. बीडच्या दवाखान्यातुन सुट्टी मिळाल्यानंतर मी त्या ठिकाणी असलेल्या पोलीस चौकीमध्ये तक्रार दिली नाही.

६. बीडच्या सरकारी दवाखान्यात मी कोणत्या वॉर्ड मध्ये भरती होतो त्याचा क्रमांक मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गवंडी/मिस्त्री काम करण्या–या लोकांकडे आर्टिकल अ वर दाखल असलेल्या हातोड्या प्रमाणे हातोडा उपलब्ध असतो.

७. हे म्हणणे खरे आहे की, बापुराव शेंद्रे यांच्या घराच्या पुर्वेस आरोपी क्र.२ ज्ञानोबा यांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, महेशचे वडील ज्ञानोबा आहेत. हे म्हणणे खरे आहे की, साहेबराव शेंद्रे हे त्यांच्या चारही मुलांसह आरोपी ज्या वाड्यामध्ये राहतात त्याच वाड्यात राहतात. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी ज्या वाड्यामध्ये राहतात त्या ठिकाणी अंदाजे २५–३० लोक राहतात. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी ज्या ठिकाणी

राहतात त्यांच्या घराच्या बाजुला जाण्या–येण्यासाठी ३–४ फुटांची एक बोळ आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर बोळातुन आरोपी व इतर काही लोक ये–जा करतात.

८. दस–याची तारीख मला सांगता येत नाही, परंतु मी दि.२५.०९.२०२२ रोजी दसरा काढत होतो. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी त्या बोळीमध्ये सरपन ठेवलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यादिवशी मी घरातील साहित्य धुण्यासाठी काढले होते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी मी पत्रे आणि घरातील साहित्य ठेवले होते त्याच्या बाजुलाच माझे घर आहे.

९. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींच्या घराच्या बाजुला जी बोळ अस्तित्वात आहे त्या बोळीच्या पश्चिम दिशेला माझे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींच्या घराजवळ असलेली बोळीची जागा हडप करण्याच्या उद्देशाने खोटी तक्रार दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या बाजुला दक्षिणोत्तर एक दुसरी ६–८ फुटांची बोळ आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरासमोर एक ओट्या सारखी भिंत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मी माझ्या घरामध्ये गडबडीने जात असताना माझ्या समोरची ओट्या सारखी भिंत माझ्या डोक्याला लागली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सोबत सदर घटने पुर्वीपासून आमचे संबंध चांगले नाहीत.

१०. हे म्हणणे खरे नाही की, महेशने माझ्या डोक्यात हातोडा मारला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मिनाक्षीने माझे हात पकडुन ज्ञानोबा याने माझ्या पाठीत दगड मारला हे मी खोटे सांगत आहे. मला पाठीत मारलेला दगड अंदाजे २५० ते ५०० ग्रॅम होता. हे म्हणणे खरे नाही की, मला मारलेला दगड मी पोलीसांना दिला नव्हता.

११. सरकारी दवाखान्यात दोन दिवस राहुन फिर्याद देण्यासाठी आलो हे विधान मी पोलीसांना सांगितले होते, परंतु दोन हा आकडा पोलीसांनी फिर्यादमध्ये का नमूद केलेला नाही त्याचे कारण मला सांगता येत नाही. पत्रे होते तसे परत लावुन देतो हे विधान मी पोलीसांना कथन केले होते, परंतु ते विधान पोलीसांनी फिर्यादमध्ये का नमूद केलेले नाही त्याचे कारण मला सांगता येत नाही.

१२. हे म्हणणे खरे नाही की, वडवणी आणि बीड च्या सरकारी दवखान्यात मी उपचार घेतलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला जिवे मारण्याची धमकी

दिली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो अशी कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास दु.२.०० वा. पुर्ण

फेरतपास नाही.

**दिनांक ०४/०२/२०२६**

| समक्ष | श्रवणोत्तर निवेदन स्विकृत |
|---|---|
| sd/- | sd/- |
| (विष्णु द. गिते)<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,<br>वडवणी, जि. बीड. | (विष्णु द. गिते)<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,<br>वडवणी, जि. बीड. |